# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/12/2022 (गुरूवार) सकाळ

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**१) पो.स्टे. काटोल :–** दिनांक २०/१२/२०२२ चे ११.०० वा. ते ११.३० वा. चे सुमारास पो.स्टे. काटोल हद्दीत फिर्यादी यांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही पेपर असल्याने कॉलेजमध्ये पेपर देण्याकरीता दिनांक २०/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. घरून निघुन गेली. फिर्यादी ही सायंकाळी कामावरून घरी परत आली तेव्हा मुलगी ही घरी दिसली नाही नातेवाईकांकडे व कालेज मध्ये जावुन विचारपुस केली असता कॉलेजमध्ये आलीच नव्हती असे सांगितले. फिर्यादी यांच्या मुलीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कोलटे पोलीस स्टेशन काटोल मो. नं ८०८०९५५५८९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. केळवद :–** दिनांक २१/१२/२०२२ चे १३.०० वा. ते १४.१५ वा. चे सुमारास पो.स्टे. केळवद हद्दीत फिर्यादी यांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही सकाळी गौमूख जूनीयर कॉलेज नांदागोमुख येथे गेली आणि घरी परत आली त्यानंतर तिचे अल्पवयाचा फायदा घेवुन फिर्यादीचे कायदेशीर रखवालीतुन अज्ञात आरोपीने फिर्यादीचे मूलीला फुस लावुन पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. ७७१ रामराव पवार ७८७५९८३३६० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर